• वर्ष : ०४ • अंक : ०१४ • पुणे • बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६ • मराठी दैनिक •पाने ४ •किंमत : २ रूपये •RNI No.-MAHMAR/2023/89313

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील लोकप्रिय दैनिक





लोटस कार्स इंडियाचा एक्सक्लुझिव्ह अनुभव घेण्याची संधी 3



मोनाली विधाते प्रकरणावर तृप्ती देसाईंचे गंभीर आरोप 4

## ठळक बातम्या

### डीजे स्पीकर जप्त करा : हायकोर्ट

मुंबई (आरंभ पर्व) : "सण-उत्सव उत्साहात जरूर साजरे करा, पण त्याची किंमत निष्पाप नागरिकांना मोजावी लागू नये. लहान मुले, रुग्ण आणि वृद्धांचे आरोग्य वेठीस धरून सणांच्या नावाखाली कर्णकर्कश आवाज जनतेवर लादता येणार नाही," अशा परखड शब्दांत मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी राज्य सरकारचे कान उपटले. न्यायालयाने सण, उत्सव आणि मिरवणुकांमध्ये सार्वजनिक रस्त्यांवर फटाके फोडण्यावर बंदी घातली आहे. तसेच नियमांचे उल्लंघन करणारे, कानठळ्या बसवणारे डीजे, लाऊडस्पीकर आणि ढोल-ताशा पथकांमधील घातक 'टोल' वाद्ये थेट जप्त करण्याचे स्पष्ट आदेश दिले आहेत. न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती डॉ. नीला गोखले यांच्या खंडपीठाने सरकारी यंत्रणांच्या कागदी दाव्यांची हवा काढली.

# विद्यानंद बापट निवडणुकीच्या मैदानात उतरणार?

## असीम सरोदे यांच्या पोस्टने राजकीय चर्चेला उधाण

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघाच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वर्तुळात नव्या नावाची चर्चा सुरू झाली आहे. डीजे आणि ध्वनिप्रदूषणाविरोधात आक्रमकपणे भूमिका मांडणारे विद्यानंद बापट निवडणुकीच्या मैदानात उतरणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे. प्रसिद्ध वकील असीम सरोदे यांनी केलेल्या एका सोशल मीडिया पोस्टमुळे या चर्चेला सुरुवात झाली आहे.



शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातून निवडून येणाऱ्या प्रतिनिधीला विधान परिषदेवर काम करण्याची संधी मिळते. त्यामुळे या निवडणुकीकडे राजकीय पक्षांसोबतच सामाजिक क्षेत्रातील व्यक्तींचेही लक्ष असते. आगामी निवडणुकीसाठी विविध राजकीय पक्षांकडून तयारी सुरू असतानाच विद्यानंद बापट यांचे नाव चर्चेत आल्याने उत्सुकता निर्माण झाली आहे. असीम सरोदे यांनी एक्सवर एक पोस्ट करत विद्यानंद बापट यांच्या सामाजिक भूमिकेचा उल्लेख केला आहे. ध्वनिप्रदूषणाच्या मुद्द्यावर बापट यांनी घेतलेल्या भूमिकेचे कौतुक करत सरोदे यांनी त्यांना पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवण्याबाबत थेट प्रश्न विचारला. त्यामुळे बापट आगामी निवडणुकीत उमेदवारी करणार का, याबाबत तर्क-वितर्कांना सुरुवात झाली आहे. "माझ्यासोबत उभ्या असलेल्या व्यक्तीचा आता खूप परिचय देण्याची आवश्यकता उरली नाही. ध्वनिप्रदूषणाच्या राक्षसा विरोधात निर्भयपणे उभा असणारा 'विद्यानंद बापट'. अनेकांच्या मनातील दुःख बोलणारा आणि उत्सवांचे विकृत स्वरूप, त्यातील ओंगळवाणेपणा चव्हाट्यावर आणणारा हिरो ठरला आहे. तर - - - विद्याविभूषित, सुसंकृत, विनम्र, अभ्यासू, प्रत्येक सामाजिक प्रश्नांची जाणीव असणारा विद्यानंद बापट आज जणू प्रत्येक घरातील आपुलकीचा सदस्य झालेला आहे. भाषेचा स्तर बिघडू न देता, विषयाला धरून बोलणारा आणि समाजाला वैश्विक बनविण्याची क्षमता असणाऱ्या विद्यानंद बापट ने पदवीधर मतदारांमधून निवडणूक लढवावी का? तुम्हाला काय वाटते?"

## आता सर्वांच्या नजरा विद्यानंद बापट यांच्या भूमिकेकडे

असीम सरोदे यांच्या पोस्टनंतर विद्यानंद बापट यांच्या राजकीय प्रवेशाची चर्चा सुरू झाली असली, तरी त्यांनी निवडणूक लढवण्याचा निर्णय घेतला आहे का, हे अद्याप समोर आलेले नाही. त्यामुळे आगामी काळात बापट यांची भूमिका काय राहते, याकडे पुणे शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघातील मतदारांसह राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

पुण्यातील गणेशोत्सवाच्या काळात डीजेच्या मोठ्या आवाजाविरोधात विद्यानंद बापट यांनी भूमिका घेतली होती. गणेश आगमन आणि विसर्जन मिरवणुकांमधील मोठ्या आवाजाच्या वापरावर त्यांनी प्रश्न उपस्थित केले. या भूमिकेमुळे त्यांना विरोधालाही सामोरे जावे लागले. त्यांच्यावर हल्ला झाल्याची घटनाही समोर आली होती.

मात्र, या प्रकरणानंतर ध्वनिप्रदूषणाचा मुद्दा पुन्हा चर्चेच्या केंद्रस्थानी आला. विशेषतः उत्सवांच्या काळात डीजे आणि लाऊडस्पीकरच्या वाढत्या वापराबाबत नागरिकांमध्येही चर्चा सुरू झाली. बापट यांच्या मराठी भाषेवरील प्रभुत्वामुळे आणि सामाजिक विषयांवरील स्पष्ट मांडणीमुळे त्यांची वेगळी ओळख निर्माण झाली आहे.

लाऊडस्पीकरच्या वापराबाबत विद्यानंद बापट यांनी कठोर भूमिका मांडली. सार्वजनिक ठिकाणी लाऊडस्पीकरच्या वापरावर निर्बंध असायला हवेत, अशी त्यांची भूमिका आहे. केवळ नियम तयार करून प्रश्न सुटणार नाही, तर त्यांची प्रभावी अंमलबजावणी होणेही आवश्यक असल्याचे ते सांगतात. सण-उत्सवांच्या काळात ध्वनिप्रदूषणाच्या नियमांच्या अंमलबजावणीत शिथिलता येऊ नये, अशी त्यांची अपेक्षा आहे. पोलिसांनी तक्रारीची वाट न पाहता आधीच नियोजन करून नियमांचे उल्लंघन रोखण्यासाठी कारवाई करावी, असेही त्यांचे मत आहे.

# पुणे जिल्हा बँकेच्या निवडणुकीचे बिगुल

- मतदान प्रतिनिधी निवडले, आता मतांचे गणित
- सहकार क्षेत्रातील राजकीय हालचालींना वेग
- विविध पक्षांच्या नेत्यांकडून तालुकानिहाय ताकदीची चाचपणी




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या संचालक मंडळाच्या पंचवार्षिक निवडणुकीची मतदान प्रतिनिधी निवडण्याची रणधुमाळी मंगळवारी संपली. जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील राजकीय हालचालींना आता वेग येणार असून, संचालकपदासाठी इच्छुक नेत्यांचा कस आता लागेल. कोणाच्या पारड्यात किती मतदान प्रतिनिधी आले आहेत, त्यावर बँकेच्या निवडणुकीतील गणित नक्की होईल.

सध्या बँक अजितदादा पवार यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या ताब्यात आहे, ती आपल्या ताब्यात घेण्यासाठी भाजपचे कसोशीने प्रयत्न सुरू आहेत. शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि शिंदे शिवसेनाही काही ठिकाणी आपले नशीब आजमावण्याचा प्रयत्न करणार आहेत. राजकीय पक्षातील या महत्वकांक्षामुळे जिल्हा बँकेची निवडणुक प्रथमच बहुपक्षीय आणि चुरशीची होणार आहे.

## 'प्रतिनिधी' ठरला; आता मतांचे गणित

मतदान प्रतिनिधी ठरले असले तरी खरी कसोटी आगामी निवडणूक प्रक्रियेत लागणार आहे. कोणत्या गटाकडे किती प्रतिनिधी आहेत, कोणत्या तालुक्यात कोणाचे वर्चस्व आहे आणि प्रत्यक्ष मतदानाच्या वेळी हे प्रतिनिधी कोणती भूमिका घेतात, यावर पुढील राजकीय गणित अवलंबून राहणार आहे.

जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्याची राजकीय व सहकारी क्षेत्रातील परिस्थिती वेगळी आहे. काही तालुक्यांत एकाच राजकीय नेत्याचे सहकारातील सोसायटीमध्ये वर्चस्व असताना, काही ठिकाणी दोन किंवा अधिक गटांमध्ये चुरस निर्माण झाली असल्याने मतदार प्रतिनिधी निवडीतूनच आगामी निवडणुकीतील संभाव्य समीकरणांचा अंदाज घेण्याचा नेत्यांचा प्रयत्न सुरू आहे. जिल्हा बँक ही केवळ आर्थिक संस्था नसून पुणे जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील महत्त्वाचे सत्ताकेंद्र आहे. या निवडणुकीत विविध राजकीय गटांचे आजी-माजी लोकप्रतिनिधी, सहकार क्षेत्रातील नेते आणि स्थानिक पदाधिकारी सक्रिय झाले आहेत. प्रतिनिधी निवडीच्या माध्यमातून प्रत्येक तालुक्यातील आपले संघटन किती मजबूत आहे, याची चाचपणीही त्यांनी केली आहे.

# उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदेंची निर्दोष मुक्तता

## वसंत डावखरे मानहानी प्रकरण : तब्बल १७ वर्षानंतर महत्त्वपूर्ण निकाल

**कल्याण (दै. आरंभ पर्व)**


दिवंगत नेते वसंत डावखरे मानहानी खटल्याचा अंतिम निकाल समोर आला आहे. यात उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांची निर्दोष मुक्तता झाली आहे. 17 वर्षांनंतर वसंत डावखरे प्रकरणी हा निकाल लागलेला असून यात ठाकरे शिंदे यांच्यासह पाच जणांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.




या संदर्भातील अधिकची माहिती अशी की, 2009 मध्ये कथित सीडी प्रकरण होते, ही सीडी लॅबमध्ये देखील पाठवण्यात आली होती. त्यावेळी न्यायालयाने 313 प्रमाणे उद्धव ठाकरे, एकनाथ शिंदे यांच्यासह इतरांचे साक्ष नोंदवले होते. मात्र जे साक्ष होते, त्यांची साक्ष या सगळ्याबाबतीत आरोप प्रत्यारोप देखील करण्यात आले होते. आज कल्याण सत्र न्यायालयाचे न्यायाधीश प्रथम वर्ग संतोष आगे यांच्या दालनात आज या संदर्भात अंतिम निकाल लागला असून ठाकरे आणि शिंदे यांच्यासह सर्व आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. या प्रदीर्घ खटल्यादरम्यान 20 हून अधिक साक्षीदारांच्या साक्षी तसेच उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांचे व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जबाब नोंदवण्यात आले. आपल्यावरील सर्व आरोप पूर्णपणे खोटे व राजकीय हेतूने प्रेरित असल्याचा जोरदार युक्तिवाद बचाव पक्षाने केला, ज्यानंतर अखेर न्यायालयाने सर्व आरोपींचे कलम 313 अंतर्गत जबाब नोंदवून ही न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण केली. 2009 च्या कल्याण लोकसभा निवडणुकीत राष्ट्रवादी कॉंग्रेसचे उमेदवार वसंत डावखरे आणि शिवसेनेचे आनंद परांजपे यांच्यात लढत होती. त्यावेळी कल्याण पूर्वेतील पोटे मैदानात परांजपे यांच्या प्रचारार्थ आयोजित शिवसेनेच्या सभेत, डावखरे यांचे 'मारा झोडा, मला कसे पण निवडून आणा, बाकीचे मी बघतो' असे आक्षेपार्ह वक्तव्य असलेली एका खाजगी सभेतील सीडी दाखवण्यात आली होती. यातून डावखरे यांची बदनामी केल्याप्रकरणी कोळसेवाडी पोलिस ठाण्यात शिवसेना नेते उद्धव ठाकरे, तत्कालीन जिल्हाप्रमुख एकनाथ शिंदे, उमेदवार आनंद परांजपे आणि सभेचे आयोजक रमाकांत देवळेकर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला होता.







# आवाज उठवणे गुन्हा नव्हे

संपादकाय — विचार आजचा... दिशा उद्याची...

**लोकशाही व्यवस्थेत प्रशासन हे जनतेसाठी असते आणि जनता ही प्रशासनाच्या कामकाजाची केवळ मूक प्रेक्षक नसते. रस्ते, पाणी, वीज, वाहतूक, स्वच्छता, आरोग्य, शिक्षण, सुरक्षा अशा मूलभूत प्रश्नांवर नागरिकांनी प्रश्न उपस्थित करणे, तक्रारी मांडणे आणि प्रशासनाकडून उत्तरदायित्वाची मागणी करणे हा त्यांचा अधिकार आहे. त्यामुळे प्रशासनाच्या एखाद्या निर्णयावर किंवा कामकाजावर आवाज उठवणे म्हणजे प्रशासनाचा विरोध करणे नव्हे; तर लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग होय.**

आज अनेक ठिकाणी नागरिक एखादी समस्या मांडतात, प्रशासनाकडे निवेदन देतात किंवा सार्वजनिक व्यासपीठावर प्रश्न उपस्थित करतात. मात्र त्यानंतर त्यांच्याकडे 'प्रशासनविरोधी' म्हणून पाहिले जाते, ही बाब चिंताजनक आहे. प्रश्न विचारणारा नागरिक हा शत्रू नसतो. उलट, तो व्यवस्थेतील त्रुटी दाखवून देत असतो. त्याच्या प्रश्नांमुळे प्रशासनाला आपल्या कामकाजातील उणिवा लक्षात येऊ शकतात आणि सुधारणा करण्याची संधी मिळू शकते. प्रशासनाकडे अधिकार असतात; मात्र त्या अधिकारांसोबत जबाबदारीही असते. नागरिकांच्या करातून व्यवस्था चालते. त्यामुळे सार्वजनिक निधीतून होणाऱ्या कामांबाबत माहिती मागणे, कामाचा दर्जा तपासणे, विलंबाबाबत प्रश्न विचारणे किंवा चुकीच्या निर्णयाविरोधात आवाज उठवणे हे स्वाभाविक आहे. नागरिकांनी प्रश्न विचारले नाहीत तर गैरव्यवस्था, निष्काळजीपणा किंवा मनमानीला आळा कसा बसणार?

मात्र आवाज उठवण्याचा अर्थ कायदा हातात घेणे असा निश्चितच नाही. लोकशाहीतील विरोध हा संयमी, तथ्याधारित आणि कायदेशीर मार्गाने असायला हवा. खोटी माहिती पसरवणे, व्यक्तीगत बदनामी करणे, हिंसक आंदोलन करणे किंवा शासकीय कामात अडथळा आणणे याला लोकशाहीतील विरोधाचे स्वरूप देता येणार नाही. प्रशासनावर टीका करताना तथ्य, पुरावे आणि योग्य भाषा यांचे भान ठेवणे आवश्यक आहे.

त्याचप्रमाणे प्रशासनानेही टीकेकडे वैयक्तिक हल्ला म्हणून पाहण्याची मानसिकता बदलण्याची गरज आहे. प्रत्येक तक्रारीमागे राजकीय हेतू आहे, प्रत्येक आंदोलनामागे स्वार्थ आहे किंवा प्रत्येक प्रश्न विचारणारा व्यक्ती विरोधक आहे, असा सरसकट निष्कर्ष काढणे योग्य नाही. अनेकदा सामान्य नागरिक स्वतःच्या परिसरातील मूलभूत प्रश्नांसाठी पुढे येतो. त्याला ऐकून घेणे, त्याची तक्रार नोंदवणे आणि शक्य असल्यास वेळेत तोडगा काढणे हे प्रशासनाचे कर्तव्य आहे.

लोकशाहीची खरी ताकद ही प्रश्न विचारण्याच्या स्वातंत्र्यात आहे. सत्तेवर असो वा प्रशासनात, कोणतीही व्यवस्था प्रश्नांच्या पलीकडे नसते. प्रश्न विचारले गेले की उत्तरदायित्व वाढते. उत्तरदायित्व वाढले की पारदर्शकता वाढते आणि पारदर्शकता वाढली की जनतेचा व्यवस्थेवरील विश्वास मजबूत होतो. आज समाजमाध्यमांमुळे नागरिकांचा आवाज अधिक वेगाने पोहोचतो. त्यामुळे प्रशासनाने टीका दडपण्याऐवजी त्यातून योग्य मुद्दे शोधण्याची गरज आहे. एखाद्या नागरिकाने रस्त्याची अवस्था दाखवली, पाणीपुरवठ्याचा प्रश्न मांडला किंवा सार्वजनिक कामातील त्रुटी निदर्शनास आणून दिली, तर त्याच्यावर कारवाई करण्याआधी त्या समस्येची दखल घेतली जाते का, हा प्रश्न प्रशासनाने स्वतःला विचारला पाहिजे. नागरिकांनीही आपली जबाबदारी ओळखली पाहिजे. प्रत्येक निर्णयाला विरोध करणे म्हणजे लोकशाही नव्हे आणि प्रशासनाने सांगितलेले प्रत्येक काम योग्य मानणेही लोकशाही नव्हे. योग्य-अयोग्य याचा विचार करून, तथ्यांच्या आधारे आणि कायदेशीर मार्गाने आपला आवाज मांडणे हीच जबाबदार नागरिकत्वाची खूण आहे.

प्रशासन आणि नागरिक यांच्यात संघर्षाची भिंत उभी राहण्याऐवजी संवादाचा पूल उभा राहायला हवा. नागरिक प्रश्न विचारतील आणि प्रशासन उत्तरे देईल; नागरिक त्रुटी दाखवतील आणि प्रशासन त्यावर सुधारणा करेल अशी परस्परपूरक व्यवस्था निर्माण झाली तर शहर, गाव आणि संपूर्ण समाजाच्या विकासाला गती मिळेल. प्रशासनाविरोधात आवाज उठवणे हा दोष नाही; अन्याय, गैरव्यवस्था किंवा दुर्लक्ष दिसूनही गप्प बसणे ही मात्र लोकशाहीसाठी अधिक गंभीर बाब ठरू शकते.

प्रश्न विचारणारा नागरिक व्यवस्थेचा विरोधक नसतो; तो व्यवस्थेला अधिक जबाबदार, पारदर्शक आणि लोकाभिमुख बनवण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वाचा भाग असतो. त्यामुळे आवाज दाबण्यापेक्षा तो ऐकणे, टीका नाकारण्यापेक्षा तिच्यातील तथ्य तपासणे आणि विरोधाला शत्रुत्व न मानता संवादाची संधी समजणे हीच सुदृढ लोकशाहीची खरी दिशा आहे.

# रानभाज्या महोत्सवाचे वांद्रे-पढरवाडीला आयोजन

- रानभाजी जतन संवर्धनासाठी विविध गावकऱ्यांचा आणि सामाजिक संस्थांचा एकत्रित पुढाकार



**राजगुरूनगर -किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

खेड तालुक्यात पश्चिम पट्ट्यातील आणि भीमाशंकर अभयारण्याच्या कुशीत वसलेल्या दुर्गम वांद्रे- पढरवाडी येथे रविवारी (दि.२७) रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

वांद्रे- पढरवाडी सामूहिक वन हक्क व्यवस्थापन समिती व इतर ग्रामस्थांतर्फे रानभाज्या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. कल्पवृक्ष (पुणे), बायफ डेव्हलपमेंट रिसर्च फाउंडेशन (पुणे), शिवशंभु सोशल फाउंडेशन (फुरसुंगी, पुणे), शिवनेरी ट्रेकर्स असोसिएशन (नारायणगाव, जुन्नर) मासूम संस्था (पुणे) या संस्था या कार्यक्रमाच्या सहआयोजक आहेत. रविवारी सकाळी ११ वाजता रानभाज्या महोत्सवास प्रारंभ होणार आहे. जंगलामध्ये नैसर्गिक पध्दतीने उगवलेल्या रानभाज्या आदिवासी लोकांच्या अन्नाचा व शरीराला आवश्यक पोषण मुल्याचा मुख्य स्त्रोत आहेत. अशा या रानभाज्यांच्या पारंपरिक खाद्य संस्कृतीचे जतन करणे, रानभाज्यांबद्दल पारंपरिक ज्ञानाचे संकलन करणे, रानभाज्यांचा गौरव करणे, रानभाज्यांप्रती जाणीव-जागृती निर्माण करणे, विविध शेतकरी, संस्था, सरकारी विभाग, यांच्या संयुक्त प्रयत्नांतून संवर्धनासाठी प्रयत्न करणे हा या रानभाजी महोत्सवाचा मुख्य उद्देश आहेत. उपस्थितांना विविध प्रकारच्या रानभाज्यांचा आस्वाद घेण्याबरोबरच रानभाज्यांविषयी माहिती घेवून त्यांच्या जतन व संवर्धन चळवळीस हातभार लावता येईल, अशी माहिती महोत्सवाच्या आयोजकांनी दिली. एकूणच भीमाशंकर अभयारण्याच्या कुशीतील रानभाज्यांचा स्वाद, जाणीव-जागृती, स्थानिक खाद्य संस्कृती, अनुभव आणि जतन संवर्धनसाठीचे प्रयत्न ही या उत्सवाची खास वैशिष्ट्ये आहेत.

आदिवासी व कष्टकरी महिला पुरुषांनी बनवलेली निसर्गाधारित उत्पादने हे देखील या उत्सवाचे एक वेगळे वैशिष्ट्य असेल. ही उत्पादने रास्त किमतीमध्ये विक्रीसाठी देखील उपलब्ध असतील.

## विक्री नव्हे तर जतन-संवर्धन

वनक्षेत्रातून अतिरेकी संकलन झाल्याने अनेक औषधी वनस्पती व रानभाज्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे. त्यामुळे या महोत्सवात रानभाज्या विक्रीवर बंदी आहे.

## आगळेवेगळे रानभाजी टेस्टिंग

या रानभाजी महोत्सवात चिचार्डी, पाथरी, कुरडू, गोमेठी, मेकं, भोकर, कोंबडा, काटेकोळसून, गोजीभ, पांढरा कुडा, भारंगी, गाजरगवत सारख्या तब्बल ४०हून अधिक रानभाज्यांचा आस्वाद घेता येणार आहे. भीमाशंकर अभयारण्यातील व आसपासच्या विविध गावांतील जवळपास १५० महिला या महोत्सवात रानभाज्यांच्या पाककृती सादर करणार आहेत. महिलांनी बनवलेल्या सुमारे ३०- ४० प्रकारच्या रानभाज्या टेबलवर रांगेत मांडलेल्या असतील. सोबत नाचणी, तांदळाच्या भाकरी असतील. सहभागी व्यक्तींना एकेका रानभाजीची चव व माहिती घेत पुढे पुढे सरकत महोत्सवाचा आस्वाद घेता येईल. यानंतर स्वतंत्र भोजन पंगतीत आदिवासींच्या पारंपरिक जेवणाचा आनंद घेता येईल.

## थोडक्यात पण महत्वाचे




### आयुक्त नवल किशोर राम यांचा वाढदिवसानिमित्त सत्कार

- उपमहापौर परशुराम वाडेकर यांच्या हस्ते स्मृतीचिन्ह व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांचे पुस्तक भेट

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेचे आयुक्त नवल किशोर राम (IAS) यांच्या वाढदिवसानिमित्त महापालिका मुख्यालयातील उपमहापौर कार्यालयात सदिच्छा सोहळ्याचे आयोजन करण्यात आले. यावेळी उपमहापौर परशुराम वाडेकर यांनी आयुक्त नवल किशोर राम यांचे स्वागत करून लोकप्रतिनिधी व पुणेकरांच्या वतीने त्यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. उपमहापौर वाडेकर यांच्या हस्ते आयुक्त नवल किशोर राम यांचा शाल आणि क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांच्या पगडीने सत्कार करण्यात आला. तसेच त्यांना आकर्षक स्मृतीचिन्ह आणि भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या भाषणांचे पुस्तक भेट देण्यात आले. अशोक स्तंभ आणि भारतीय राष्ट्रध्वजाची प्रतिकृती असलेले हे स्मृतीचिन्ह काचेच्या पेटीत जतन करण्यात आले आहे. या वेळी महापालिकेचे विरोधी पक्षनेते निलेश निकम तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सर्वांनी आयुक्तांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. सत्कार सोहळ्यानंतर उपस्थित मान्यवर, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी चहापानाचा आस्वाद घेतला. यावेळी उपमहापौर व आयुक्त यांच्यात पुणे शहरातील आगामी पायाभूत सुविधा, नागरी विकास आणि प्रलंबित प्रकल्पांना गती देण्याबाबत अनौपचारिक चर्चा झाली. लोकप्रतिनिधी आणि प्रशासनातील सुसंवादातून शहराच्या विकासाला चालना मिळेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.


### श्रद्धांजली, समाजप्रबोधन आणि खेळ! गणेशोत्सवात अनोखी सजावट




संगमेश्वर (आरंभ पर्व) : सेलिब्रिटी हेअर स्टायलिस्ट बंधू चव्हाण यांचा घरगुती गणपती असला तरी त्याची सजावट होती सार्वजनिक गणेश मंडळासारखी त्यांनी 'कै. चंद्रभागा सिताराम चव्हाण' सभामंडप बनवला होता. त्या सभामंडपात आपल्या मागच्या पिढीची आठवण आणि अनेक शुभेच्छा पर जाहिराती दिसत होत्या. त्यात तीन विशेष लक्षवेधी बॅनर पाहायला मिळाले एक होता कोकणचा बुलंद आवाज शाहीर कै. रामचंद्र घाणेकर तुरेवाले यांना श्रद्धांजली, ज्यांच्या गाण्यावर अख्खा महाराष्ट्र ठेका धरतो. दुसरा बॅनर होता. कै. समीर कदम बुवा यांना श्रद्धांजली. कोकणातील भजनाचा बुलंद आवाज, जे सध्या अख्या महाराष्ट्राच्या हिताचे काम करतायेत ते तुकाराम मुंढे. संत तुकाराम चारशे वर्षानंतर महाराष्ट्र सेवेसाठी तुकाराम मुंढे यांच्या रूपाने महाराष्ट्रात अवतरले त्यांच्या पाठीशी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी कायम उभा रहावं असं गणराया चरणी साकड घातलेला बॅनर पाहायला मिळालं. यावर्षी एका वेगळ्या पद्धतीची सजावट पाहायला मिळाली. बंधू चव्हाण यांच्याशी बोलताना त्यांनी सांगितले की, गौरी गणपती या आठ दिवसात त्यांनी विविध कार्यक्रम आयोजन केले होते. शेखर चव्हाण (बुवा), परशुराम चव्हाण (बुवा) आणि सहकारी यांच्या "नवयुवक भजन मंडळ बुरंबाड"यांचे भजन दुसऱ्या दिवशी वाडीतील महिला आणि पुरुषमंडळींसाठी क्रिकेट सामने एक वेगळा अनुभव वाडीतील मंडळींसाठी होता. दरवर्षी अशा पद्धतीचे वेगवेगळे कार्यक्रम व्हावेत मुंबईत राहणारा कोकणवासी कोकणात गणपती सणाला आवर्जून येतात त्यांनी देखील आपापल्या भागात असे उपक्रम राबवावेत असे आवाहन त्यांनी सर्वांना केले.

# एअरटेलने आपल्या पोस्टपेड ऑफरिंगमध्ये केली वाढ

## ॲपलच्या नव्याने विस्तारित आयक्लाउड+ सोबत ॲपल टीव्ही आणि ॲपल आर्केडचा समावेश




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नवी दिल्ली, २२ सप्टेंबर २०२६: भारतातील आघाडीच्या टेलिकम्युनिकेशन सर्व्हिस प्रोव्हायडर्सपैकी एक असलेल्या भारती एअरटेलने आपल्या ₹९९९ आणि त्याहून अधिक किमतीच्या फॅमिली पोस्टपेड प्लॅन्समध्ये ॲपलच्या आयक्लाउड+ चा समावेश करून त्यात आणखी सुधारणा केल्याची घोषणा केली आहे. नव्याने विस्तारित आयक्लाउड+ मध्ये आता ॲपल टीव्ही आणि ॲपल आर्केडचाही समावेश आहे. यामुळे कस्टमर्सना अधिक व्हॅल्यू मिळणार असून, त्यांचे पोस्टपेड प्लॅन अपग्रेड करण्यासाठी आणखी एक कारण मिळणार आहे. एअरटेलच्या या नव्या पोस्टपेड ऑफरिंगमध्ये ॲपलच्या नव्याने विस्तारित आयक्लाउड+ ऑफरिंग्जचा समावेश आहे. यामध्ये पर्सनल कंटेंट सुरक्षितपणे स्टोअर करणे आणि शेअर करणे, तसेच ॲपल टीव्हीवरील पुरस्कारप्राप्त ओरिजिनल्सचा ॲक्सेस आणि ॲपल आर्केडवरील शेकडो अत्यंत मनोरंजक गेम्सचा आनंद घेण्याची सुविधा मिळते. ही नवी ऑफर ₹९९९ आणि त्याहून अधिक किमतीचे फॅमिली प्लॅन्स वापरणाऱ्या एअरटेल कस्टमर्ससाठी उपलब्ध आहे. आयक्लाउड+ मुळे एअरटेलचे लाखो पोस्टपेड कस्टमर्स त्यांच्या ॲपल डिव्हाइसेसवर फोटो, फाइल्स, पासवर्ड्स, कॉन्टॅक्ट्स आणि इतर महत्त्वाची माहिती स्टोअर, सिंक आणि ॲक्सेस करू शकतील. त्यांचा डेटा सुरक्षितपणे बॅकअपही केला जाईल. त्यामुळे नवीन डिव्हाइस सेट अप करणे अधिक सोपे होईल आणि त्यांचे डिजिटल जीवन कनेक्टेड आणि सहज ॲक्सेस करता येण्याजोगे राहील. ॲपल टीव्हीच्या माध्यमातून ॲपलच्या प्रीमियम ओरिजिनल सीरिज आणि मुव्हीजचा ॲक्सेस मिळतो, तर ॲपल आर्केडवर जाहिराती किंवा इन-ॲप पर्चेसेसशिवाय गेम्सच्या कॅटलॉगचा अनलिमिटेड ॲक्सेस मिळतो. कस्टमर्स एअरटेल ॲपच्या माध्यमातून किंवा कोणत्याही एअरटेल स्टोअरला भेट देऊन या प्लॅन्समध्ये सहज अपग्रेड करू शकतात. अमित त्रिपाठी, डायरेक्टर, मार्केट ऑप्स – भारती एअरटेल, म्हणाले: "एअरटेलमध्ये आम्ही आमच्या कस्टमर्सचे जीवन अधिक सोपे करण्यासोबतच आमच्या प्रपोजिशन्सच्या माध्यमातून त्यांना अधिक वेगळे आणि उपयुक्त व्हॅल्यू कसे देता येईल, याचा सातत्याने विचार करतो. आमचे फॅमिली पोस्टपेड प्लॅन्स याच विचारसरणीवर आधारित आहेत — संपूर्ण कुटुंबासाठी महत्त्वाची असलेली कनेक्टिव्हिटी, एंटरटेनमेंट आणि डिजिटल एक्सपीरियन्सेस एकाच प्लॅनमध्ये उपलब्ध करून देणे. आमच्या फॅमिली पोस्टपेड प्लॅन ऑफरिंगमध्ये ॲपलचे आयक्लाउड+, ॲपल टीव्ही आणि ॲपल आर्केड यांचा समावेश करून आम्ही ही प्रपोजिशन आणखी पुढे नेली आहे. यामुळे कस्टमर्सना आणखी अधिक व्हॅल्यू मिळेल आणि एअरटेलचा एक्सपीरियन्स अधिक रिवॉर्डिंग होईल."

₹९९९ फॅमिली पोस्टपेड प्लॅनमध्ये तीन जणांच्या कुटुंबासाठी फास्टलेन टेक्नॉलॉजीसह अनलिमिटेड डेटा, स्पॅम प्रोटेक्शन आणि विविध एंटरटेनमेंट सब्स्क्रिप्शन्सचा ॲक्सेस मिळतो. ॲपलचे आयक्लाउड+, ॲपल टीव्ही आणि ॲपल आर्केड यांचा समावेश झाल्यामुळे या प्लॅनमधून आता कुटुंबांना आणखी अधिक व्हॅल्यू मिळते. कनेक्टिव्हिटी, एंटरटेनमेंट, गेमिंग आणि क्लाउड स्टोरेज या सर्व सुविधा एकाच पोस्टपेड प्लॅनमध्ये उपलब्ध करून देत, कस्टमर्सना आपला पोस्टपेड प्लॅन अपग्रेड करण्यासाठी आणि त्यातून अधिक व्हॅल्यू मिळवण्यासाठी आणखी एक कारण मिळाले आहे.

# देविका दफ्तरदार यांची भावस्पर्शी भूमिका असलेला 'सहल' ९ ऑक्टोबरला



**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मराठी चित्रपटसृष्टीतील गुणी अभिनेत्री देविका दफ्तरदार महत्त्वपूर्ण भूमिकेतून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहेत. 'सहल' या आगामी मराठी चित्रपटात त्यांची भावस्पर्शी भूमिका पहायला मिळणार आहे. ९ ऑक्टोबरला 'सहल' चित्रपटगृहात प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटाचं पोस्टर लाँच करण्यात आलं आहे.

के. स्वामिनी फिल्म प्रॉडक्शनच्या बॅनरखाली निर्मित या चित्रपटाचे लेखन आणि दिग्दर्शन मुकुंद वसंत खुपेरकर यांनी केले आहे. चित्रपटाचे निर्माते प्रशांत केसरकर आणि विलास केसरकर असून, सहनिर्माते मुकुंद वसंत खुपेरकर आहेत. मूळ पटकथा मुकुंद वसंत खुपेरकर यांनी लिहिली आहे. 'सहल'मध्ये देविका दफ्तरदार यांच्यासोबत सिद्धेश मुकुंद खुपेरकर, कल्याणी अडसुळ, आदित्य खुपेरकर आणि सागर कोळी यांच्या प्रमुख भूमिका आहेत. सिद्धेश मुकुंद खुपेरकर याचे या चित्रपटाच्या माध्यमातून मुख्य नायक म्हणून पदार्पण असून त्याने याआधी झी मराठीवरील प्रसिद्ध मालिका "तुझ्यात जीव रंगला" ह्यामध्ये लहान राणाच्या भावाची म्हणजेच सुरजची भुमिका साकारली होती, तसेच डॉ केशव हेगडेवार ह्यांची बाल भुमिका ही साकारली होती.

चित्रपटाचे छायांकन अभिषेक शेटे यानी केले असून, संकलनाची जबाबदारी चंद्रशेखर गुरव यांनी सांभाळली आहे. सुहास मुंढे, समीर पठाण यांनी लिहिलेल्या गीतांना डॉ. जय भीम शिंदे यांचे संगीत दिग्दर्शन लाभले असून सुप्रसिद्ध गायक आदर्श शिंदे याच्या आवाजात चित्रपटातील गीत स्वरबद्ध करण्यात आले आहे. मुकुंद वसंत खुपेरकर यांनी कार्यकारी निर्माता, श्रेय चव्हाण यांनी वेशभूषा, आदित्य चव्हाण यांनी ध्वनिसंयोजन तर प्रशांत कुंभार यांनी कला दिग्दर्शन केले आहे.

# राजीव तलरेजा यांना मार्गदर्शक म्हणून नियुक्त

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

आसुस इंडियाला आपल्या EXPERT SERIES पीसींच्या 'चिंतामुक्त व्यवसायासाठी निर्मित' या वचनाला अधिक बळकटी देण्यासाठी, एमएसएमई तज्ज्ञ आणि क्वांटम लीपचे संस्थापक, राजीव तलरेजा यांची एमएसएमई विभागासाठी मार्गदर्शक म्हणून घोषणा करताना अभिमान वाटत आहे. या महत्त्वपूर्ण, दीर्घकालीन सहकार्याचा उद्देश भारतीय एमएसएमई नेते व्यावसायिक संगणकांचा वापर कसा करतात याला पुनर्परिभाषित करणे, आणि त्यांना तांत्रिक अडथळ्यांवर मात करून शाश्वत उद्योजकीय वाढीवर पूर्णपणे लक्ष केंद्रित करण्यासाठी सक्षम करणे हा आहे. भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे रोजगार देणारे क्षेत्र आणि एक मोठे आर्थिक इंजिन म्हणून, एमएसएमई वेगाने विस्तारत आहेत. ही गती कायम ठेवण्यासाठी, व्यवसाय मालकांनी एंटरप्राइझ वर्कलोडसाठी खास तयार केलेले पीसी (PCs) वापरून दैनंदिन तांत्रिक अडथळे दूर केले पाहिजेत, ज्यामुळे उत्पादकता आणि सहयोग वाढतो. राजीव तलरेजा हे एमएसएमईंचा अंतिम आवाज आहेत आणि त्यांना एमएसएमई संस्थापकांच्या मुख्य कार्यात्मक गरजांची सखोल जाण आहे.

क्वांटम लीपच्या प्रशिक्षण आणि मार्गदर्शनाद्वारे १२ लाखांहून अधिक व्यवसाय मालकांना प्रशिक्षित केल्यामुळे, त्यांना या परिसंस्थेची सखोल समज आहे, जी एमएसएमईंच्या यशासाठी असलेल्या आसुसच्यावचनबद्धतेशी पूर्णपणे जुळते. गेल्या वर्षीच्या सुरुवातीला, आसुस ने बाजारातील एक मोठी उणीव ओळखली . ती म्हणजे, लहान व्यवसाय आणि व्यावसायिकांना बिझनेस ग्रेड लॅपटॉपची गरज होती, परंतु त्यांना अधिक चांगल्या पर्यायांबद्दल फारशी माहिती नव्हती. परिणामी, बहुतेक जण सामान्य आणि आधुनिक रिटेल चॅनेलमधून नॉन-बिझनेस लॅपटॉप खरेदी करत होते.

# ड्रीमे एक्स६० अल्ट्रा कम्प्लीट भारतात दाखल

## ३५,००० पास्कल सक्शनसह स्मार्ट स्वच्छतेचा नवा अनुभव




**नवी दिल्ली (दै. आरंभ पर्व)**

स्मार्ट होम तंत्रज्ञान क्षेत्रातील ड्रीमे टेक्नॉलॉजीने भारतात आपला प्रमुख ड्रीमे एक्स६० अल्ट्रा कम्प्लीट रोबोट व्हॅक्यूम सादर केला आहे. अधिक शक्तिशाली सक्शन, कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित अडथळा ओळख, अत्याधुनिक नेव्हिगेशन आणि स्वयंचलित मॉप देखभाल अशा वैशिष्ट्यांसह हे उत्पादन घराच्या स्वच्छतेला अधिक स्वयंचलित बनवण्यासाठी तयार करण्यात आले आहे.

या रोबोट व्हॅक्यूमची जाडी केवळ ७.९५ सेंटीमीटर असून, पलंग, सोफा आणि कपाटांखालील कमी उंचीच्या जागांमध्येही तो पोहोचू शकतो. मागे घेता येणाऱ्या डीटीओएफ सेन्सरमुळे मोकळ्या जागेत परिसराचे ३६० अंश स्कॅनिंग करता येते, तर अरुंद जागेत हा सेन्सर आपोआप मागे घेतला जातो. ड्रीमे एक्स६० अल्ट्रा कम्प्लीटमध्ये ३५,००० पास्कलची व्होरमॅक्स सक्शन क्षमता देण्यात आली आहे. धूळ, कचरा आणि बारीक कण प्रभावीपणे खेचण्यासोबतच केसांचा गुंता कमी करण्यासाठी प्रेशरस्ट्रीम डिटँगलिंग ड्युओब्रश प्रणाली देण्यात आली आहे.

ड्युअल फ्लेक्स आर्म तंत्रज्ञानामुळे साईड ब्रश आणि मॉप पॅड अरुंद कोपऱ्यांपर्यंत पोहोचतात. त्यामुळे फर्निचरच्या कडांजवळ आणि इतर अवघड भागांमध्येही स्वच्छता करण्यास मदत होते. ड्रीमेच्या फ्लेक्सीअडॅप्ट तंत्रज्ञानामुळे रोबोटला ४.२ सेंटीमीटरपर्यंतचे एक-स्तरीय आणि ८ सेंटीमीटरपर्यंतचे दुहेरी अडथळे पार करता येतात. त्यामुळे घरातील वेगवेगळ्या भागांमध्ये अधिक सहजपणे हालचाल करणे शक्य होते. या मॉडेलचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे १०० अंश सेल्सिअस थर्मोहब मॉप सेल्फ-क्लीनिंग प्रणाली.

गरम पाण्याचा वापर करून मॉप पॅड स्वच्छ केले जातात. तेलकटपणा आणि हट्टी डाग काढण्यास यामुळे मदत होते.

मॉपिंगसाठी २३० आरपीएम ड्युअल ओम्नी-स्क्रब प्रणाली आणि १५ न्यूटनपर्यंतचा खालील दाब देण्यात आला आहे. त्यामुळे फरशीवरील रोजची घाण, सांडलेले पदार्थ आणि हट्टी डाग साफ करण्यास मदत होते. सेलेस्ट लायटिंगसह एआय ओम्नीडर्ट तंत्रज्ञानाच्या मदतीने पाळीव प्राण्यांचे केस, बारीक कण आणि सहज न दिसणारी घाण ओळखण्याचा प्रयत्न केला जातो. त्यानुसार रोबोट आपल्या स्वच्छतेच्या पद्धतीत बदल करू शकतो.

## भारतात १.३४ लाख रुपयांची किंमत

ड्रीमे एक्स६० अल्ट्रा कम्प्लीटची किंमत १,३४,९९९ रुपये ठेवण्यात आली आहे. हे उत्पादन २२ सप्टेंबरपासून ड्रीमे इंडियाच्या अधिकृत संकेतस्थळावर, तर २७ सप्टेंबर २०२६ पासून ॲमेझॉन इंडियावर उपलब्ध होणार आहे. याशिवाय क्रोमा आणि निवडक किरकोळ विक्री केंद्रांमधूनही ते खरेदी करता येईल.

दैनिक आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com
बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६





## थोडक्यात पण महत्वाचे



### ‘एमआयटी एडीटी’च्या इंग्रजी शिक्षण मॉडेलची ‘केंब्रिज’कडून दखल

पुणे (आरंभ पर्व) : इंग्रजी भाषेतील प्रावीण्य वाढविण्यासाठी गेल्या चार वर्षांत १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांना प्रशिक्षण देऊन केंब्रिज लिंग्वास्किल प्रमाणपत्र मिळवून देण्याचा उपक्रम राबविल्याबद्दल एमआयटी आर्ट, डिझाइन अँड टेक्नॉलॉजी (एमआयटी एडीटी) विद्यापीठाच्या कार्याचा चार वर्षांचा प्रभाव-अभ्यास केंब्रिज विद्यापीठ, यूकेने प्रकाशित केला आहे. या अभ्यासाचे प्रकाशन तसेच लिंग्वास्किल प्रमाणपत्र वितरण समारंभ मंगळवारी विद्यापीठाच्या प्रयाग सभागृहात पार पडला. केंब्रिज विद्यापीठाचे उत्पादन व्यवस्थापक इयान कॉवली कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. राजेश एस., प्रोव्होस्ट प्रा. डॉ. सायली गणारकर, केंब्रिज विद्यापीठाच्या दक्षिण आशिया विभागाच्या प्रमुख डॉ. संगीता मेहता, केंब्रिज परीक्षा केंद्राचे व्यवस्थापक डॉ. अतुल पाटील, विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक डॉ. ज्ञानदेव निलवर्ण हेही व्यासपीठावर उपस्थित होते. एमआयटी एडीटी विद्यापीठाच्या अधिकृत केंब्रिज केंद्राच्या माध्यमातून प्रथम वर्षातील विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी भाषेचे प्रशिक्षण आणि मूल्यांकन अनिवार्य करण्यात आले आहे. त्यानुसार, ‘केंब्रिज इंग्लिश मूल्यमापनाद्वारे रोजगारक्षम संवादकौशल्यांची बळकटी’ या शीर्षकाखाली विद्यार्थ्यांच्या संवादकौशल्याचा आणि रोजगारक्षमतेचा विकास करण्यासाठी विद्यापीठाने राबविलेल्या इंग्रजी भाषा उपक्रमाचा अभ्यास व मूल्यांकन केंब्रिजतर्फे करण्यात आले. एमआयटी एडीटी केंब्रिज केंद्राद्वारे मागील चार शैक्षणिक वर्षांत १० हजारांहून अधिक विद्यार्थ्यांनी इंग्रजी भाषेच्या प्रावीण्याचे प्रशिक्षण घेत प्रमाणपत्र मिळविले आहे. मागील शैक्षणिक वर्षात लिंग्वास्किल परीक्षेला बसलेल्या ३,४६१ विद्यार्थ्यांपैकी ३७८ विद्यार्थ्यांनी सी१ आणि सी२ ही उच्च प्रावीण्याची पातळी प्राप्त केली आहे. या विद्यार्थ्यांनी आंतरराष्ट्रीय स्तरावरील संवादकौशल्याचे मानदंड गाठल्याचे विद्यापीठाच्या वतीने सांगण्यात आले.



### ‘ह्युंदाई एक्सप्लोरर्स कार्निव्हल २०२६’च्या तिसऱ्या पर्वाचे आयोजन

पुणे (आरंभ पर्व) : ह्युंदाई मोटर इंडिया लिमिटेड (एचएमआयएल) ने आज ‘ह्युंदाई एक्सप्लोरर्स कार्निव्हल २०२६’च्या तिसऱ्या पर्वाची घोषणा केली. ह्युंदाई ग्राहक आणि त्यांचे कुटुंबीय यांच्यातील एकतेची व सहजीवनाचा उत्सव साजरा करणारा हा ह्युंदाईचा प्रमुख ग्राहक सहभाग उपक्रम आहे. विविध शहरांमध्ये आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्निव्हलच्या माध्यमातून ह्युंदाई ग्राहक आणि त्यांच्या कुटुंबीयांना एकमेकांशी जोडले जाण्याची, सहभागी होण्याची आणि अविस्मरणीय अनुभव निर्माण करण्याची संधी मिळणार आहे. यामुळे एका वाहन मालकीचा प्रवासाप्रती ह्युंदाईची वचनबद्धता अधिक दृढ होईल. २०२६च्या या पर्वाचे आयोजन ऑक्टोबर ते डिसेंबर २०२६ या कालावधीत पाच शहरांमध्ये करण्यात येणार आहे. याची सुरुवात ३ ऑक्टोबर २०२६ रोजी पुण्यातून होईल. त्यानंतर लखनौ, लुधियाना, भुवनेश्वर आणि हैदराबाद या शहरांमध्ये कार्निव्हलचे आयोजन केले जाईल.

### ह्युंदाई मोटर ग्रुप तर्फे ह्युंदाई सीओई मोबिलिटी इनोव्हेशन आयडियाथॉन

पुणे (आरंभ पर्व) : भारतातील भविष्यातील मोबिलिटी इकोसिस्टीम प्रती आपली कटिबद्धता दर्शवत ह्युंदाई मोटर ग्रुप तर्फे ह्युंदाई सेंटर ऑफ एक्सलन्स (ह्युंदाई सीओई) मोबिलिटी इनोव्हेशन आयडियाथॉन आणि रिसर्च सिनर्जी फोरम हे दोन प्रमुख उद्योग शिक्षण सहयोगी उपक्रम ह्युंदाई सीओई अंतर्गत सुरू केले आहेत. या उपक्रमाच्या माध्यमातून सात विद्यापीठांमधील विद्यार्थी,प्राध्यापक आणि संशोधक एकत्र येऊन यामुळे भविष्यातील मोबिलिटी तंत्रज्ञानामध्ये नवोपक्रम,ज्ञान आदान-प्रदान आणि प्रतिभा विकासासाठी एक व्यासपीठ तयार होईल. मोबिलिटी इनोव्हेशन आयडियाथॉन हे सप्टेंबर ते डिसेंबर 2026 दरम्यान सुरू राहणार असून ह्युंदाई सीओई सदस्य विद्यापीठांना एनहान्स्ड इन - व्हेइकल एक्सपिरियन्स थीम अंतर्गत नवीन कल्पना विकसित करण्यासाठी आमंत्रित केले गेले आहे.इंडिया स्मार्ट इंटरॲक्शन,एआय पॉवर्ड आणि डिजिटल इन - व्हेइकल एक्सपिरियन्स, नेक्स्ट जनरेशन इन व्हेईकल इंटरफेस आणि स्मार्ट व्हॅल्यू इनोव्हेशन या चार गटात संकल्पना सादर केल्या जाऊ शकतात.

# पर्यावरण तंत्रज्ञानाच्या अभ्यासासाठी सागर अहिवळे चेक प्रजासत्ताकच्या दौऱ्यावर

## जल, कचरा व्यवस्थापनातील आधुनिक तंत्रज्ञानाचा अभ्यास करणार; जल अर्थव्यवस्था बळकट करण्यावर भर



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
जल व कचरा व्यवस्थापन, सर्क्युलर इकॉनॉमी आणि शाश्वत तंत्रज्ञानातील आधुनिक पद्धतींचा अभ्यास करण्यासाठी ‘ग्रीन सोल्यूशन’चे व्यवस्थापकीय संचालक सागर अहिवळे चेक प्रजासत्ताकच्या दौऱ्यावर आहेत. चंदीगडचे मुख्य सचिव एच. राजेश प्रसाद यांच्या नेतृत्वात गेलेल्या या भारतीय उद्योगांच्या शिष्टमंडळात भारतातील केवळ १० व्यक्तींचा सहभाग असून, महाराष्ट्रातून सागर अहिवळे यांच्यासह निव बायोरूट्स सस्टेनेबल फ्युएल्सचे स्वप्नील गावकर हेही सहभागी आहेत. हा दौरा २५ सप्टेंबरपर्यंत असून, यामध्ये प्राग, झ्लिन आणि ओस्त्रावा येथे विविध बैठका व चर्चांमध्ये ते सहभागी होणार आहेत. या दौऱ्यात जलशुद्धीकरण, सांडपाणी प्रक्रिया, कचरा व्यवस्थापन आणि संसाधन पुनर्वापरातील प्रगत तंत्रज्ञानाचा अभ्यास करण्यात येत आहे. चेक प्रजासत्ताकमधील आधुनिक तंत्रज्ञान भारतात आणण्याबरोबरच भारतीय उद्योगांसाठी संयुक्त संशोधन आणि व्यवसाय सहकार्याच्या संधी निर्माण करण्यावर अहिवळे यांचा भर आहे. या मोहिमेमुळे जल व्यवस्थापन, कचरा व्यवस्थापन आणि चक्रीय अर्थव्यवस्था उपक्रमांमध्ये भारतीय आणि चेक भागधारकांमध्ये व्यावहारिक भागीदारीचा मार्ग मोकळा होण्याची अपेक्षा आहे. भारतीय उद्योगांना शाश्वततेच्या दृष्टीने सक्षम करण्यासाठी चेक प्रजासत्ताकमधील तंत्रज्ञान संस्था व उद्योगांशी संपर्क वाढविणे, तसेच ‘बी टू बी’ भागीदारीच्या संधी शोधणे हा या सहभागाचा प्रमुख उद्देश आहे. जलसंवर्धन, पाण्याचा पुनर्वापर, सांडपाणी प्रक्रिया तसेच कचऱ्यातून ऊर्जा व संसाधन निर्मितीच्या क्षेत्रातील नव्या पद्धतींचा अभ्यास करून त्यांचा भारतातील उपयोग तपासला जात आहे. राजेश प्रसाद यांनी भारतात ‘जल अर्थव्यवस्था’ बळकट करण्याची गरज व्यक्त केली आहे. मिशनमध्ये आयआयटी रोपार, चितकारा विद्यापीठातील प्राध्यापक, प्रशासनातील अधिकारी, संशोधक आणि उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी सहभागी झाले आहेत. यावेळी चेक प्रजासत्ताकचे पर्यावरण उपमंत्री इव्हो मार्सिन यांनी सामायिक पर्यावरणीय आव्हानांना सामोरे जाण्यासाठी आंतरराष्ट्रीय सहकार्याचे महत्त्व अधोरेखित केले. कचऱ्याच्या पारंपरिक विल्हेवाटीऐवजी पुनर्वापर, संसाधनांची प्राप्ती आणि संसाधनांचा कार्यक्षम वापर याकडे वळण्यावर भर दिला. या शिष्टमंडळात सार्वजनिक प्रशासन, धोरणनिर्मिती, शिक्षण क्षेत्र, संशोधन संस्था आणि अग्रगण्य कंपन्यांचे प्रतिनिधी आहेत.

सागर अहिवळे यांच्या सहभागामुळे भारतीय उद्योगांना जागतिक पर्यावरण तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी तसेच आधुनिक तंत्रज्ञान, संयुक्त संशोधन आणि व्यावसायिक सहकार्याच्या नव्या संधी निर्माण करण्यास चालना मिळण्याची अपेक्षा आहे. भारतीय उद्योगांना शाश्वततेच्या दृष्टीने अधिक सक्षम करणे आणि चेक रिपब्लिकमधील अत्याधुनिक तंत्रज्ञान भारतात आणण्यासाठी संयुक्त संशोधन व व्यवसाय सहकार्याची दालने उघडणे, हे सागर अहिवळे यांच्या या दौऱ्याचे मुख्य उद्दिष्ट आहे.

## यूथ4इम्पॅक्टचा शुभारंभ

**पुणे (दै. आरंभ पर्व)**
तरुणांमध्ये नेतृत्वगुण विकसित करण्याच्या उद्देशाने देशव्यापी युवा नेतृत्व विकास कार्यक्रम यूथ4इम्पॅक्टचा शुभारंभ बेंगळुरू येथील पीईएस विद्यापीठात करण्यात आला. बेंगळुरूमधील सुमारे ६०० तरुण या कार्यक्रमात सहभागी होणार असून, देशभरातील ३,६०० हून अधिक तरुणांना या उपक्रमाशी जोडण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. १८ वर्षांवरील विद्यार्थी करू शकतात अर्ज जागृती यात्रा आणि भारतातील एआयईएसईसी यांच्या वतीने सुरू करण्यात आलेल्या यूथ4इम्पॅक्टला रिलायन्स फाउंडेशन, रिलायन्स कन्झ्युमर प्रॉडक्ट्स लिमिटेड आणि भारतातील एआयईएसईसी यांच्या भागीदारीतून तरुणांना शिकण्यासाठी, नेतृत्व करण्यासाठी आणि कृती करण्यासाठी सक्षम करणे, तसेच हा अनुभव जागृती यात्रा २०२६च्या माध्यमातून पुढे नेण्यास मदत करणे, हे आमचे उद्दिष्ट आहे.

## ‘बीएनसीए’च्या वतीने आठ महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे स्वच्छता अभियान

- नदीकाठच्या ओंकारेश्वर व विठ्ठलवाडी मंदिर परिसरातील निर्माल्य व कचरा साफ




**पुणे (दै. आरंभ पर्व)**
महर्षी कर्वे स्त्रीशिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनच्या (बीएनसीए) वतीने शहरातील आठ आर्किटेक्चर कॉलेजच्या मिळून ६५ विद्यार्थी-विद्यार्थिनी स्वयंसेवकांनी मिळून शहरातील मुठा नदीकाठावरील ऐतिहासिक ओंकारेश्वर व विठ्ठलवाडी मंदिर व परिसरातील अस्ताव्यस्त पडलेले निर्माल्य व कचरा साफ केला. नॅशनल असोसिएशन ऑफ स्टूडंट्स ऑफ आर्किटेक्चरच्या (नासा) ६९व्या स्थापना दिनानिमित्त गणेशोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी हा उपक्रम राबवण्यात आला. गणेशोत्सवात आणि त्यानंतरही आपले शहर एकजुटीने शहर स्वच्छ ठेवण्याचे आवाहन बीएनसीए व या उपक्रमातील सहभागी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी पुणेकर नागरिकांना केले.

या उपक्रमात बीएनसीएसह बीकेपीएस कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, डी. वाय. पाटील स्कूल ऑफ आर्किटेक्चर, श्रीमती काशिबाई नवले कॉलेज ऑफ आर्किटेक्चर, एमआयटी स्कूल ऑफ आर्किटेक्चर, एमआयटी एडीटी, व्हीयू स्कूल ऑफ आर्किटेक्चर अँण्ड प्लॅनिंग पुणे आणि एस. बी. पाटील कॉलेज कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँण्ड डिझाईन यांचा समावेश होता.

## पुण्यात लोटस कार्स इंडियाचा एक्सक्लुझिव्ह अनुभव घेण्याची संधी



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
'लोटस कार्स इंडिया'ने देशभरात ग्राहक आणि संभाव्य ग्राहकांसाठी एका विशेष 'ब्रँड अनुभव' उपक्रमाची घोषणा केली आहे. या उपक्रमाद्वारे त्यांची पुरस्कारविजेती इलेक्ट्रिक परफॉर्मन्स कार 'लोटस इलेट्रे' भारतातील प्रमुख लक्झरी वाहन बाजारपेठांमधील ग्राहकांपर्यंत पोहोचवली जाणार असून, या दौऱ्याच्या पश्चिम भारतातील टप्प्यामध्ये पुणे हे एक महत्त्वाचे ठिकाण असणार आहे. विविध शहरांच्या या दौऱ्याचा एक भाग म्हणून लोटस कार्स इंडिया संभाव्य ग्राहक, उद्योजक, व्यावसायिक नेते, आलिशान जीवनशैलीचे ग्राहक आणि वाहनप्रेमींसाठी २१ ते २३ सप्टेंबर २०२६ या कालावधीत पुण्यात एका विशेष ब्रँड अनुभवाचे आयोजन करत आहे. पुणे ॲक्टिव्हेशनची रचना ग्राहक आणि ब्रँड अनुभव म्हणून करण्यात आली आहे. त्यामध्ये निवडक निमंत्रितांना विशेष ड्राईव्ह अनुभव, व्यक्तिगत उत्पादन प्रात्यक्षिके आणि ब्रँडची सविस्तर माहिती दिली जाईल. लोटस इलेट्रे ही ब्रँडची संपूर्ण इलेक्ट्रिक हायपर-एसयूव्ही आहे. यामध्ये जबरदस्त कामगिरी, प्रगत तंत्रज्ञान आणि दैनंदिन उपयुक्तता यांचा संगम साधण्यात आला आहे. ही गाडी लोटससाठी एका नव्या पर्वाचे प्रतिनिधित्व करणारी असून ती या ब्रँडच्या समानार्थी असलेली कामगिरी करून दाखविते. त्याचसोबत एका लक्झरी एसयूव्हीकडून अपेक्षित असलेली बहुविध उपयोगिताही देते. लोटस कार्स इंडियाच्या संचालिका एमी अरोरा म्हणाल्या, “आमच्या जाणकार ग्राहकांसाठी सर्वोत्तम दर्जाचे ब्रँड्स आणि अनुभव घेऊन येणे हा आमचा नेहमीच प्रयत्न राहिला आहे. उत्कृष्टतेला नवे अर्थ देणारे आणि संपूर्ण उद्योगासाठी उच्च मानकांना प्रेरणा देणारे मापदंड स्थापित करण्यावर आमचा विश्वास आहे. अढळ निर्धार आणि 'ग्राहक प्रथम' हे तत्त्वज्ञान यांमुळे आम्ही इतरांपेक्षा वेगळे ठरतो, त्यामुळे प्रगतीची पातळी सतत उंचावण्याची आणि आमच्या ग्राहकांशी दीर्घकाळ टिकणारे नातेसंबंध निर्माण करण्याची आम्हाला प्रेरणा मिळते.

## तरुण भारतीय आता लवकरच घराचे मालक

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**
भारतातील तरुणांच्या घरखरेदीच्या दृष्टिकोनात मोठा बदल होत असल्याचे कोटक महिंद्रा बँकेच्या आकडेवारीतून समोर आले आहे. पूर्वी करिअरमध्ये स्थिरावल्यानंतर घर खरेदी करण्याकडे कल असताना, आता जेन झीमधील अनेक तरुण वयाच्या तिशीपूर्वीच स्वतःचे घर घेण्याचा निर्णय घेत आहेत. कोटक महिंद्रा बँकेच्या आकडेवारीनुसार, २५ ते ३० वयोगटातील गृहकर्ज ग्राहकांची संख्या आर्थिक वर्ष २०२४ ते २०२६ या कालावधीत ८६ टक्क्यांनी वाढली आहे. या ग्राहकांची संख्या १,२३४ वरून २,२९० पर्यंत पोहोचली आहे. याच काळात कोटकच्या वैयक्तिक गृहकर्ज ग्राहकांमध्ये जेन झीचा वाटा ६ टक्क्यांवरून ९ टक्क्यांपर्यंत वाढला आहे. म्हणजेच या वयोगटाच्या सहभागात ५० टक्क्यांची वाढ झाली आहे.

# सूर्यदत्ततर्फे राष्ट्रीय पुरस्कार आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान सोहळा

## बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे २७ सप्टेंबरला आयोजन; गुरुदेव रामनिक मुनीजी व प.पू. हिमानीजी यांचा विशेष सन्मान



**पुणे (दै. आरंभ पर्व)**
सूर्यदत्त एज्युकेशन फाउंडेशन संचालित बन्सी-रत्न वेल्फेअर ट्रस्टतर्फे समाजासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्ती, कुटुंबे आणि गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यासाठी ‘राष्ट्रीय पुरस्कार २०२६’ तसेच विविध पुरस्कारांच्या सन्मान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या रविवार, २७ सप्टेंबर रोजी दुपारी ३ वाजता महर्षीनगर येथील शिवशंकर सभागृहात हा सोहळा होणार आहे. या पुरस्कारांचे यंदा दहावे वर्ष आहे.

ट्रस्टतर्फे दरवर्षी जैन समाजातील समाजसेवा, सामाजिक विकास आणि सामुदायिक विकासासाठी उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्ती आणि कुटुंबांना आदर्श परिवार, आदर्श माता-पिता, समाज शिरोमणी, समाजरत्न, समाजभूषण, मानवसेवा राष्ट्रीय पुरस्कार तसेच ‘आयकॉन ऑफ राजस्थान’ अशा विविध पुरस्कारांनी गौरविण्यात येते.

यंदाचा ‘सूर्यदत्त’चा प्रतिष्ठेचा पुरस्कार गुरुदेव प. पू. रामनिक मुनीजी म. सा. (वाणीचे जादूगार) आणि प.पू. हिमानीजी म.सा. यांना प्रदान करण्यात येणार आहे. त्यांच्या आध्यात्मिक प्रवासासोबतच समाजासाठी केलेले योगदान आणि मानवसेवेतील कार्याची दखल घेऊन हा सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कारार्थींना सन्मानपत्र, स्मृतिचिन्ह आणि पारंपरिक शाल देऊन गौरविण्यात येणार आहे.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अहिंसा विश्व भारतीचे संस्थापक आचार्य डॉ. लोकेश मुनीजी राहणार आहेत. प्रसिद्ध शास्त्रज्ञ व आयसरचे सल्लागार डॉ. अरविंद नातू प्रमुख पाहुणे म्हणून, प्रसिद्ध अभिनेते रझा मुराद विशेष अतिथी म्हणून, तर हिंदुस्थानी शास्त्रीय संगीत क्षेत्रातील प्रसिद्ध गायिका पद्मश्री डॉ. सोमा घोष सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित राहणार आहेत. यावेळी जैन, गुजराती, माहेश्वरी आणि अग्रवाल समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचाही विशेष सत्कार करण्यात येणार आहे. इयत्ता दहावी, बारावी, पदवी आणि पदव्युत्तर शिक्षणात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना पुरस्कार देऊन गौरविण्यात येणार आहे.

‘सूर्यदत्त’चे संस्थापक व अध्यक्ष प्रा. डॉ. संजय बी. चोरडिया यांनी सांगितले की, हा उपक्रम विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कर्तृत्वाची दखल घेण्याबरोबरच त्यांच्या पुढील करिअरसाठी योग्य संधी आणि मार्गदर्शन मिळवून देणारे व्यासपीठ आहे. पात्र विद्यार्थ्यांनी सूर्यदत्तच्या संकेतस्थळावर उपलब्ध अर्ज भरावा. सन्मान सोहळ्यास विद्यार्थ्यांची वैयक्तिक उपस्थिती अनिवार्य असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

याशिवाय पदव्युत्तर व तत्सम अभ्यासक्रमात ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे, शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये पीएच. डी. पूर्ण करणारे विद्यार्थी, तसेच २०२६-२७ मध्ये आयआयटी, आयआयएम यांसारख्या राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्थांमध्ये किंवा एमबीबीएस, एमडी आणि तत्सम अभ्यासक्रमांसाठी मान्यताप्राप्त संस्थांमध्ये प्रवेश मिळविणारे विद्यार्थी पात्र आहेत.

सीए, सीएस, आयसीडब्ल्यूए आणि तत्सम परीक्षा शैक्षणिक वर्ष २०२६ मध्ये पहिल्याच प्रयत्नात उत्तीर्ण झालेले विद्यार्थी तसेच प्रतिष्ठित परदेशी विद्यापीठात प्रवेश मिळविणारे विद्यार्थीही या सन्मानासाठी नोंदणी करू शकतात. पात्र विद्यार्थ्यांनी २५ सप्टेंबर २०२६ पर्यंत अर्ज करावा, असे आयोजकांनी आवाहन केले आहे.

### कोणते विद्यार्थी पात्र?

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ मध्ये इयत्ता दहावी किंवा बारावीमध्ये ९० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी या सन्मानासाठी पात्र आहेत. मान्यताप्राप्त विद्यापीठातून कला, वाणिज्य किंवा विज्ञान शाखेतील पदवीमध्ये ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे तसेच फार्मसी, अभियांत्रिकी, वास्तुकला आणि तत्सम चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमात ८० टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थीही अर्ज करू शकतात.

## थोडक्यात पण महत्वाचे



### श्रीमंत श्री धारेश्वर तरुण मंडळाचे अथर्वशीर्ष पठण उत्साहात संपन्न

सिंहगड रस्ता (आरंभ पर्व) : श्रीमंत श्री धारेश्वर तरुण मंडळ, यांच्यावतीने मारुती मंदिर धायरी येथे गणेश उत्सवानिमित्त सामूहिक अथर्वशीर्ष पठण आयोजित करण्यात आले होते या कार्यक्रमांमध्ये महिलांची संख्या लक्षणीय व विशेष म्हणजे पुरुष मंडळींनी ही सहभाग घेतला होता पुणे व शहर परिसरातील महिला भगिनी व पुरुष मोठ्या संख्येने सकाळी सहा वाजता अथर्वशीर्ष पठण करण्यासाठी उपस्थित होते अतिशय प्रसन्न वातावरणात एकीच्या भावनेतून या का कार्यक्रम संपन्न करण्यात आला श्रीमंत धारेश्वर मंडळाचे हे 78 वे वर्ष असून मंडळ नेहमीच सामाजिक उपक्रम राबवत असते गणेशोत्सवाच्या काळात दर वर्षी आरोग्य शिबिर व रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात येते जेणेकरून समाजाला आपणही काहीतरी देणे लागतो या भावनेतून हे उपक्रम राबवले जातात मागील वर्षी पूरग्रस्त सोलापूर जिल्ह्यातील गावाला मदत देण्याचे कामे मंडळाने केले आहे मंडळाच्या सर्व कार्यकर्ते अनेक कार्यक्रम एकीच्या भावनेतून साजरे करत असतात यातून समाजात चांगल्या प्रकारचा संदेश जात असून तरुण पिढी एकत्रित येऊन असे उपक्रम राबवल्याने एकमेकांमध्ये मदत करण्याची भावना निर्माण होत असते मंडळाचे अध्यक्ष प्रमोद रायकर व सर्व कार्यकर्ते उपक्रम राबविण्यासाठी तत्पर असतात या कार्यक्रमासाठी सागर जगताप, हर्षल रायकर, तानाजी कांबळे, दिलीप रायकर, अमोल रायकर, रोहित रायकर, विशाल रायकर, आकाश शिखरे, आकाश गायकवाड ओम डूबल, समीर रायकर, कैलास नाना रायकर, सुरेश गायकवाड, पांडुरंग रायकर, श्याम सनी रायकर रायकर, दत्ता नाना रायकर, डॉ सुनिकेत रायकर, पंढरीनाथ रायकर, बबन रायकर, श्रेयस रायकर मंडळाचे इतरही पदाधिकारी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### ढोल-ताशाच्या जल्लोषात सांध्यांकडे दुर्लक्ष नको! पाठ व मानेवर ताण

पुणे (आरंभ पर्व) : गणेशोत्सवात ढोल-ताशा वादनाची प्रवृत्ती वाढत असून, पथकांची तसेच सहभागी तरुणांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. सरावापासून ते प्रत्यक्ष मिरवणुकीपर्यंत सलग अनेक तास वादन केल्याने खांदा, हात, मनगट, पाठ, पायांचे सांधे आणि मानेतील मणक्यांवर ताण येत आहे. उत्साहाच्या वातावरणात सुरुवातीच्या वेदनांकडे दुर्लक्ष करून वादन सुरूच ठेवल्याने काही तरुणांमध्ये गंभीर स्नायू व सांध्यांच्या दुखापती होत असल्याचे अस्थीविकार तज्ज्ञांनी सांगितले. गेल्या काही दिवसांत ढोल-ताशा वादनामुळे झालेल्या दुखापतींच्या तक्रारी घेऊन येणाऱ्या तरुण रुग्णांची संख्या वाढली आहे. सुरुवातीला किरकोळ वाटणाऱ्या वेदनांकडे दुर्लक्ष केल्याने काही रुग्णांमध्ये स्नायूंच्या दुखापती गंभीर झाल्या असून, काहींवर शस्त्रक्रिया करण्याची वेळ आल्याचे अस्थीविकार तज्ज्ञ डॉ. सचिन करकमकर यांनी सांगितले. ढोल-ताशा वाजवताना खांदा, हात आणि मनगटाच्या हालचाली वारंवार आणि मोठ्या ताकदीने केल्या जातात. शरीराची पुरेशी तयारी नसल्यास किंवा सलग अनेक तास वादन केल्यास खांद्याच्या स्नायू व टेंडनवर अतिरिक्त ताण येतो. त्यामुळे लिगामेंट दुखापत, रोटेटर कफची इजा, स्नायूंना ताण तसेच खांदा अस्थिर होण्याच्या समस्या उद्भवू शकतात. अचानक जोराची हालचाल, चुकीची शरीरस्थिती किंवा पडल्यामुळे खांदा निखळण्याची (डिसलोकेशन) शक्यताही असते. वादनापूर्वी १० ते १५ मिनिटे वॉर्म-अप व स्ट्रेचिंग करावे. ढोल किंवा ताशा योग्य पद्धतीने बांधावा. खांद्यावर अतिरिक्त भार येणार नाही, याची काळजी घ्यावी. सलग अनेक तास वादन न करता मध्ये विश्रांती घ्यावी. वेदना सुरू झाल्यास त्याकडे दुर्लक्ष करून वादन सुरू ठेवू नये. शरीराला पुरेसा रिकव्हरी टाइम द्यावा.

### इलेक्ट्रिक वाहन क्षेत्रातील नवकल्पनांना गती देण्यासाठी

# ‘एआयसी पिनॅकल’ व ‘नॅट्रॅक्स’ यांच्यात सामंजस्य करार

## स्टार्टअप इनक्युबेशन, चाचणी, उद्योग क्षेत्राशी संपर्क व व्यावसायिकीकरणासाठी मिळणार सहकार्य




**पुणे (दै. आरंभ पर्व)**

इलेक्ट्रिक वाहने, ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञान आणि कनेक्टेड मोबिलिटी क्षेत्रातील नवकल्पना व स्टार्टअपला गती देण्यासाठी एआयसी पिनॅकल एंटरप्रेन्युअरशिप फोरम आणि नॅशनल ऑटोमोटिव्ह टेस्ट ट्रॅक्स (नॅट्रॅक्स) यांच्यात सामंजस्य करारावर १६ सप्टेंबर २०२६ रोजी स्वाक्षरी करण्यात आली. स्टार्टअप इनक्युबेशन, तांत्रिक मार्गदर्शन, चाचणी व प्रमाणीकरण सुविधा तसेच उद्योग क्षेत्राशी संपर्क उपलब्ध करून देणे, हा या कराराचा प्रमुख उद्देश आहे. स्टार्टअपसाठी ऑटोमोटिव्ह चाचणी सुविधा आणि उद्योग क्षेत्राशी संपर्क यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत होऊन पुढील पिढीतील मोबिलिटी तंत्रज्ञानाच्या विकासाला चालना मिळणार आहे. चाकण येथील ‘पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स-इका’च्या प्रकल्पात एआयसी पिनॅकलचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अविनाश ठाकूर आणि 'नॅट्रॅक्स'चे संचालक डॉ. मनीष जैस्वाल यांनी सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या केल्या. यावेळी ‘इका-पिनॅकल मोबिलिटी सोल्युशन्स’चे मुख्य उत्पादन अधिकारी झोएब अल्ताफहुसेन करमपूरवाला, संशोधन व विकास विभागाचे मुख्य अभियंते, कौस्तुभ जोशी व पंकज मुनोळी, स्वप्नील तांबे उपस्थित होते. 'एआयसी पिनॅकल'तर्फे वरिष्ठ व्यवस्थापक शादाब हुसेन, तर 'नॅट्रॅक्स'तर्फे वरिष्ठ अभियंता व समूह प्रमुख तुलिका मजुमदार उपस्थित होत्या. 'एआयसी पिनॅकल'कडे स्टार्टअप इनक्युबेशन, मार्गदर्शन आणि उद्योगांशी संपर्काचे व्यापक जाळे आहे, तर 'नॅट्रॅक्स'कडे अत्याधुनिक वाहन चाचणी व प्रमाणीकरणाची सुविधा आहे. या भागीदारीअंतर्गत स्टार्टअप इनक्युबेशन, कौशल्यविकास कार्यक्रम, हॅकाथॉन, नवकल्पना स्पर्धा, तांत्रिक सत्रे, मार्गदर्शन कार्यक्रम आणि उद्योगांशी संवाद अशा विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. विशेषतः इलेक्ट्रिक वाहने आणि ऑटोमोटिव्ह मोबिलिटी क्षेत्रातील स्टार्टअपना तांत्रिक तज्ज्ञ, उद्योगांचे नेटवर्क आणि चाचणी सुविधांचा लाभ मिळवून देण्यावर भर राहणार आहे. डॉ. अविनाश ठाकूर म्हणाले, ‘नॅट्रॅक्स' सोबतची भागीदारी स्टार्टअप आणि ऑटोमोटिव्ह चाचणी व प्रमाणीकरण क्षेत्रामधील महत्त्वाचा दुवा ठरेल. इनक्युबेशनच्या पलीकडे जाऊन नवकल्पनांना तांत्रिक, औद्योगिक आणि चाचणीविषयक मदत मिळवून देत बाजारपेठेसाठी तयार उत्पादने विकसित करण्यास प्रोत्साहन देणे, हा आमचा उद्देश आहे. इलेक्ट्रिक आणि कनेक्टेड मोबिलिटी क्षेत्रात या सहकार्यामुळे अनेक उपयुक्त उपक्रम राबविता येतील. स्टार्टअपना उद्योग, धोरणात्मक भागीदार, शैक्षणिक संस्था, सरकारी यंत्रणा आणि इतर संबंधित संस्थांशी जोडण्याचाही प्रयत्न केला जाणार आहे. महाराष्ट्रासह मध्यप्रदेश आणि देशातील ऑटोमोटिव्ह नवकल्पना परिसंस्थेशी स्टार्टअपचे संबंध अधिक दृढ करण्यावर भर दिला जाणार आहे. डॉ. मनीष जैस्वाल म्हणाले, “नवकल्पनांना पाठबळ देणे आणि ऑटोमोटिव्ह तंत्रज्ञानाची परिसंस्था अधिक सक्षम करणे, यासाठी नॅट्रॅक्स कटिबद्ध आहे. एआयसी पिनॅकलसोबतच्या सहकार्यामुळे स्टार्टअप आणि नवोन्मेषकांना चाचणी, प्रमाणीकरण आणि तांत्रिक सुविधांचा लाभ मिळेल. अशा भागीदारीमुळे भविष्यातील मोबिलिटी तंत्रज्ञानाच्या विकासाला आणि स्वीकाराला गती मिळू शकते.”

> "एआयसी पिनॅकल एंटरप्रेन्युअरशिप फोरम ही अटल इनोव्हेशन मिशन, नीती आयोगाच्या सहकार्याने कार्यरत ना-नफा तत्त्वावरील स्टार्टअप इनक्युबेटर संस्था आहे. इलेक्ट्रिक वाहने, पर्यावरण व शाश्वतता, क्लीनटेक, हेल्थटेक, उत्पादन व अभियांत्रिकी यांसह विविध उदयोन्मुख क्षेत्रांतील स्टार्टअपना इनक्युबेशन, मार्गदर्शन, उद्योगांशी संपर्क आणि कौशल्यविकासाच्या माध्यमातून सहकार्य केले जाते. येत्या काळात इलेक्ट्रिक वाहनांना प्राधान्य दिले जाईल. इलेक्ट्रिक मोबिलिटी विकसित होण्यासाठी हा सामंजस्य करार उपयुक्त ठरेल."
>
> **- डॉ. सुधीर मेहता, पिनॅकल ग्रुपचे संस्थापक अध्यक्ष**

### चिंचवडमध्ये मंगळवारी अतिवृष्टी, तासाभरात १०४.५ मिमी पावसाची नोंद

**पिंपरी (दै. आरंभ पर्व)**

पिंपरी-चिंचवड परिसरात मंगळवारी (दि. २२) सायंकाळी मुसळधार पावसाने जोरदार हजेरी लावली. चिंचवडमध्ये तासाभरात १०४.५ मि.मी. पावसाची नोंद झाली. तर शहरातील अनेक सखल भाग जलमय झाले. चिखली, मोशी, निगडी, आकुर्डी, भोसरी आणि तळवडे परिसरातील रस्ते, भुयारी मार्ग, सोसायट्या तसेच औद्योगिक आस्थापनांमध्ये पाणी साचले.

मोशीतील पुणे-नाशिक महामार्गावर पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली, तर तळवडे औद्योगिक वसाहतीतील काही कंपन्यांमध्ये पाणी शिरल्याने तयार माल आणि मशिनरीचे नुकसान झाले. चिखलीतील घरकुल वसाहतीमधील डी-१२ इमारतीजवळील चेंबर तुंबल्याने पाणी साचले. भाजी मंडई परिसरातील बी, सी, डी आणि एफ इमारतीजवळील रस्ते तसेच पार्किंग आणि मंडईत पाणी साचले होते. मोरेवस्तीतील साई मंदिराजवळील यशवंत कॉलनीत मोठ्या प्रमाणात पाणी साचले. कृष्णाई आणि



ओमसाई सोसायटीमध्ये चिखली-आकुर्डी रस्त्यावरून वाहून आलेले पाणी साचले होते. वाघू साने चौक ते झेंडा चौकादरम्यान रस्त्यावर पाण्याचे तळे निर्माण झाले होते. आकुर्डी रेल्वेस्थानकाजवळील वाल्हेकरवाडीकडे जाणाऱ्या भुयारी मार्गात पाणी साचल्याने काही काळ वाहतूक बंद करण्यात आली. डॉ. डी. वाय. पाटील रुग्णालय तसेच रावेतकडे जाणाऱ्या भुयारी मार्गातही पाणी साचल्याने वाहतूक संथ झाली. प्राधिकरणातील काचघर चौक ते तहसील कार्यालयादरम्यान हरित सेतूचे काम सुरू आहे. त्यामुळे रस्त्यावरील खड्ड्यांत पाणी साचल्याने वाहनचालकांना ये-जा करताना अडचणींचा सामना करावा लागला.

## पॉकेटफुलकडून पुण्यात नवीन शाखेचे उद्‌घाटन

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पॉकेटफुल या सेबी-नोंदणीकृत नेक्स्ट-जनरेशन इन्व्हेस्टिंग आणि ट्रेडिंग प्लॅटफॉर्मने पुण्यात आपली नवीन शाखा डीएनके स्क्वेअर, रामवाडी चौक, एयरपोर्ट रोड, पुणे येथे सुरू केली आहे. यासह कंपनीने महाराष्ट्रातील आपली उपस्थिती अधिक दृढ केली आहे. राज्यातील मोठ्या संख्येने गुंतवणूकदार आधीच कंपनीच्या ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा वापर करत असताना हे नवीन कार्यालय कंपनीला विद्यमान ग्राहकांशी अधिक दृढ संबंध निर्माण करण्यास आणि पुण्यातील बाजारपेठेतील सहभागी, उद्योजक व सक्रिय ट्रेडर्सच्या वाढत्या समुदायाशी जोडले जाण्यास मदत करेल.



हे नवीन कार्यालय व्यवसाय विकास, ग्राहक संपादन आणि धोरणात्मक सहयोगांसाठी स्थानिक केंद्र म्हणून कार्य करेल. आपल्या विस्ताराचा भाग म्हणून, पॉकेटफुल विक्री, रिलेशनशिप मॅनेजमेंट आणि इतर व्यवसाय-संबंधित विभागांमध्ये कर्मचाऱ्यांची भरती करण्याची योजना आखत आहे. ही टीम ग्राहकांशी संवाद अधिक सुलभ संवाद साधण्यासाठी, व्यवसायाच्या नवीन संधी शोधण्यासाठी आणि पुण्याच्या आर्थिक व व्यावसायिक परिसंस्थेमध्ये परस्परसंबंध निर्माण करण्यासाठी काम करेल.

पुण्यातील हे कार्यालय शहरातील अधिकाधिक जाणकार गुंतवणूकदार वर्गाच्या गरजा पूर्ण करण्याच्या पॉकेटफुलच्या प्रयत्नांनाही पाठबळ देईल. कंपनीची प्रीमियम सेवा लेजेंड्स सानुकूलित ब्रोकरेज रचना आणि निवडक प्रायव्हेट-मार्केट संधींचा लाभ उपलब्ध करून देते. ही सेवा अधिक विशेषीकृत गुंतवणूक अनुभवाच्या शोधात असणारे सक्रिय ट्रेडर्स, सीएक्सओ, अनिवासी भारतीय (एनआरआय) आणि फॅमिली ऑफिसेसच्या गरजा लक्षात घेऊन डिझाइन करण्यात आली आहे.

या घडामोडीबाबत मत व्यक्त करत पॉकेटफुलचे सर्वम गोयल म्हणाले, "आम्हाला पुण्यासारख्या गतिमान आर्थिक परिसंस्था आणि अधिकाधिक माहितीपूर्ण गुंतवणूकदार समुदाय असलेल्या शहरात आमची प्रत्यक्ष उपस्थिती अधिक दृढ करताना अत्यंत आनंद होत आहे. या पुढाकारामधून आमचे डिजिटल व्यासपीठ आणि दृढ स्थानिक उपस्थिती यांची सांगड घालण्याचे आमचे व्यापक धोरण दिसून येते. यामुळे आम्हाला बाजारपेठेच्या गरजा अधिक बारकाईने समजून घेणे आणि ग्राहकांना अधिक मूल्य प्रदान करणे शक्य होईल. आम्ही पुण्यामध्ये सक्षम टीम उभी करण्यासाठी, तसेच पुण्यातील बदलत्या गुंतवणूक क्षेत्रात योगदान देण्यासाठी उत्सुक आहोत." नवी दिल्ली येथे मुख्यालय असलेली आणि नोएडा व चेन्नईमध्ये कार्यरत कार्यालये असलेली पॉकेटफुल प्रमुख बाजारपेठांमध्ये आपली उपस्थिती अधिक दृढ करत आहे. देशभरात विस्तृत नेटवर्क उभे करताना कंपनी पंजाब, गुजरात आणि पश्चिम बंगालमध्येही प्रादेशिक कार्यालये स्थापन करण्याची योजना आखत आहे.

# मोनाली विधाते प्रकरणावर तृप्ती देसाईंचे गंभीर आरोप

## अंधश्रद्धेच्या बाजारापासून कथित शोषणापर्यंत अनेक दावे; तक्रारदार पुढे येत असल्याचा दावा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

मोनाली विधाते प्रकरण गेल्या काही दिवसांपासून चर्चेत असताना सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी एका मुलाखतीत या प्रकरणाबाबत अनेक गंभीर आरोप आणि दावे केले आहेत. या प्रकरणाचा संबंध केवळ एका व्यक्तीपुरता मर्यादित नसून अंधश्रद्धा, कथित आर्थिक फसवणूक, महिलांचे शोषण, सामाजिक माध्यमांवरील प्रभावाचा वापर आणि तक्रारदारांवरील कथित दबाव अशा विविध मुद्द्यांशी जोडला जात असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र, मुलाखतीत करण्यात आलेले आरोप हे संबंधित व्यक्तीविरुद्ध न्यायालयीनरीत्या सिद्ध झालेले तथ्य नसून त्यांची स्वतंत्र पडताळणी आवश्यक आहे.




तृप्ती देसाई यांच्या म्हणण्यानुसार, काही तक्रारदार त्यांच्या संपर्कात आले असून त्यांच्याकडून कथित फसवणूक आणि आर्थिक व मानसिक त्रासाबाबत माहिती देण्यात आली आहे. एका तक्रारदाराने घरातील अडचणी दूर करण्याच्या नावाखाली भीती निर्माण करून पैसे घेतल्याचा दावा त्यांनी केला. या संदर्भात बिबवेवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल झाल्याचेही त्यांनी मुलाखतीत सांगितले.

मुलाखतीत तृप्ती देसाई यांनी सामाजिक माध्यमांवरील चित्रफिती आणि वाढते अनुयायी यांचा वापर करून लोकांना आकर्षित केले जात असल्याचा आरोप केला. त्यांच्या म्हणण्यानुसार, अनेक तक्रारदारांनी संबंधित व्यक्तीशी संपर्क साधण्याचे कारण म्हणून सामाजिक माध्यमांवरील चित्रफिती पाहिल्याचे सांगितले आहे. त्यामुळे सामाजिक माध्यमांवर प्रसिद्ध होणाऱ्या आध्यात्मिक किंवा धार्मिक आशयाच्या चित्रफितींच्या सत्यतेची पडताळणी करणे गरजेचे असल्याचा मुद्दा त्यांनी उपस्थित केला. त्यांनी सामाजिक माध्यमांवरील काही प्रतिक्रिया आणि कौतुकाच्या संदेशांबाबतही प्रश्न उपस्थित केले. काही प्रतिक्रिया कृत्रिमरीत्या तयार केल्या जात असल्याचा दावा त्यांनी केला; मात्र या दाव्यांची स्वतंत्र पुष्टी मुलाखतीत उपलब्ध नाही.

या संपूर्ण प्रकरणाच्या निमित्ताने तृप्ती देसाई यांनी अंधश्रद्धा आणि तथाकथित आध्यात्मिक सेवांच्या नावाखाली नागरिकांची फसवणूक होत असल्याचा व्यापक मुद्दा उपस्थित केला. संकटात सापडलेले नागरिक मार्गदर्शनासाठी अशा व्यक्तींकडे जातात; मात्र त्यांच्या असहायतेचा आर्थिक फायदा घेतला जाऊ शकतो, असा त्यांचा दावा आहे.

काही तथाकथित आध्यात्मिक व्यक्ती मोठ्या प्रमाणावर दागिने परिधान करून सामाजिक माध्यमांवर चित्रफिती प्रसारित करतात आणि त्यातून स्वतःची वेगळी प्रतिमा निर्माण करतात, अशी टीकाही त्यांनी केली. धार्मिक श्रद्धा आणि वैयक्तिक आर्थिक व्यवहार यामधील पारदर्शकतेचा प्रश्न यामुळे पुढे येत असल्याचे त्यांनी नमूद केले. हे दावे तपासाचा भाग ठरल्यास तक्रारदारांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही महत्त्वाचा ठरणार आहे. तक्रारदारांवर कोणताही दबाव किंवा धमकी आली आहे का, याची अधिकृत चौकशी होणे आवश्यक ठरेल.

मुलाखतीत तृप्ती देसाई यांनी मोनाली विधाते यांच्या पूर्वीच्या नावांचा आणि कथित गुन्हेगारी पार्श्वभूमीचा उल्लेख केला. पूर्वी काही गुन्हे दाखल झाल्याचा तसेच कारवाई झाल्याचा दावा त्यांनी केला. मात्र, अशा दाव्यांची अधिकृत पोलीस नोंद, न्यायालयीन कागदपत्रे किंवा अधिकृत आदेशांद्वारे पडताळणी होणे आवश्यक आहे. तृप्ती देसाई यांनी स्पष्ट केले की, त्यांचा मुद्दा केवळ मोनाली विधाते यांच्यापुरता मर्यादित नसून श्रद्धेचा गैरवापर करणाऱ्या आणि कथित अंधश्रद्धेला प्रोत्साहन देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीविरोधात सामाजिक जनजागृती करण्याचा आहे. अशा प्रकरणांची कायदेशीर चौकशी व्हावी आणि दोष सिद्ध झाल्यास कायद्यानुसार कारवाई व्हावी, अशी भूमिका त्यांनी मांडली.

श्रद्धा विरुद्ध अंधश्रद्धा : आता प्रश्न समाजासमोर

मोनाली विधाते प्रकरणाच्या निमित्ताने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. श्रद्धा ठेवणे हा प्रत्येकाचा वैयक्तिक अधिकार आहे; मात्र श्रद्धेच्या नावाखाली आर्थिक व्यवहार होत असतील, नागरिकांची भीती किंवा असहायता वापरली जात असेल किंवा महिलांच्या शोषणाचे आरोप होत असतील, तर त्याची कायदेशीर आणि वस्तुनिष्ठ चौकशी होणे आवश्यक आहे.

सामाजिक माध्यमांच्या वाढत्या प्रभावामुळे एखाद्या व्यक्तीची प्रतिमा काही दिवसांत मोठ्या प्रमाणावर निर्माण होऊ शकते. त्यामुळे केवळ चित्रफिती, अनुयायांची संख्या किंवा कौतुकाच्या प्रतिक्रिया पाहून कोणत्याही दाव्यावर विश्वास ठेवण्याऐवजी नागरिकांनी माहितीची पडताळणी करणे गरजेचे आहे. या प्रकरणातील आरोपांची सत्यता तपास यंत्रणा, अधिकृत कागदपत्रे आणि न्यायालयीन प्रक्रियेतूनच स्पष्ट होईल. मात्र, या निमित्ताने श्रद्धा, अंधश्रद्धा, सामाजिक माध्यमांचा प्रभाव, महिलांची सुरक्षितता आणि तक्रारदारांचे संरक्षण हे प्रश्न पुन्हा एकदा सार्वजनिक चर्चेच्या केंद्रस्थानी आले आहेत.

### अल्पवयीन मुलीच्या कथित शोषणाचा गंभीर आरोप

मुलाखतीतील सर्वात गंभीर दाव्यांपैकी एक म्हणजे एका अल्पवयीन मुलीला वयाच्या तेराव्या वर्षी कथितरीत्या देहविक्रीकडे ढकलल्याचा आरोप. संबंधित मुलगी कामाच्या शोधात आली असताना तिच्या परिस्थितीचा गैरफायदा घेतल्याचा दावा तृप्ती देसाई यांनी केला आहे. हा अत्यंत गंभीर आरोप असून त्याची सत्यता तपासण्यासाठी अधिकृत तपास यंत्रणेकडून चौकशी आणि संबंधित पुराव्यांची पडताळणी आवश्यक आहे. देसाई यांनी आणखी काही महिला त्यांच्या संपर्कात आल्याचा दावा केला असून, विविध जिल्ह्यांमधून तक्रारी येत असल्याचेही त्यांनी सांगितले. भविष्यात आणखी गुन्हे दाखल होण्याची शक्यता असल्याचे त्यांनी मुलाखतीत म्हटले आहे.

### तक्रारदारांना संरक्षणाचा प्रश्न ऐरणीवर

या प्रकरणात तक्रारदार पुढे येण्यास घाबरत असल्याचा दावा देसाई यांनी केला. काही तक्रारदारांना धमक्या दिल्या गेल्याचे आणि एका तक्रारदाराच्या वाहनाचा पाठलाग झाल्याचे त्यांनी मुलाखतीत सांगितले. तसेच तक्रार दाखल करण्याच्या दिवशी तक्रारदारासोबत आपण आणि पत्रकार मच्छिंद्र टिंगरे दिवसभर उपस्थित असल्याचेही त्यांनी सांगितले.

### इंदुरीकर महाराजांच्या जुन्या वादाचाही उल्लेख

याच मुलाखतीत तृप्ती देसाई यांनी कीर्तनकार इंदुरीकर महाराजांच्या जुन्या वादाचाही संदर्भ दिला. महिलांविषयीच्या काही कथित वक्तव्यांवर आपण पूर्वी आक्षेप घेत आंदोलन केले होते, असे त्यांनी सांगितले. त्या काळात मोठ्या प्रमाणावर टीका आणि समाजमाध्यमांवर ट्रोलिंग झाल्याचा दावाही त्यांनी केला. अलीकडे इंदुरीकर महाराजांच्या मुलीची नृत्याची चित्रफीत समाजमाध्यमांवर प्रसारित झाल्यानंतर झालेल्या प्रतिक्रियांचा संदर्भ देत, सार्वजनिक व्यासपीठावर महिलांविषयी बोलताना समान निकष ठेवण्याची गरज असल्याचे देसाई यांनी म्हटले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.